## Pimpri Chinchwad Police Commissionerate

### प्रेस नोट ता. १२/१२/२०१९

**घरफोडी चोरी करणारे व रेकॉर्डवरील तडीपार आरोपी ०३ चोरीचे मोबाईलसह चिखली पोलीसांच्या जाळयात एकुण ०२ गुन्हे उघडकीस आणुन व ०१ तडीपार गुन्हा दाखल**
**एकुण ७,५००/- रु. माल जप्त करणेस**
**चिखली पोलीस ठाणे कडील पोलीसांची कामगीरी**

---

दि. ११/१२/२०१९ रोजी पोलीस उपनिरीक्षक मधुसुदन घुगे, सपोफौ. वर्पे, पोहवा. १७६ काळे, पोना. ११३३ साकोरे असे चिखली पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त पेट्रोलींग फिरत असताना रात्रौ २१/४५ वा. चे. सुमारास शिवपार्वती बिल्डींगचे जवळ ,चिंचेचामळा, मोरेवस्ती चिखली पुणे येथे दोन इसम पोलीसांना पाहून पळून जाऊ लागले असता त्यांचा पाठलाग करून थोडयाच अंतरावर त्यांना पकडून त्यांचे नाव विचारता १) दिनेश राम कोळी वय २२ वर्ष रा. साने चेंम्बर्स,साने कॉलनी,मोरेवस्ती चिखली पुणे २) लक्ष्मण बसवराज गाडेकर वय २२ वर्ष रा.राममंदिराजवळ, त्रिवेणीनगर, तळवडे पुणे असे असून त्यांची अंगझडती घेता दिनेश कोळी याचे पॅन्टचे खिश्यात गोल्डन सिल्व्हर मिक्स रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट मिळून आला त्याबाबत त्याचेकडे विचापूस करता त्याने सांगितले की, मी व माझा मित्र नामे लक्ष्मण गाडेकर असे मिळून म्हेत्रेवस्ती टॉवर लाईन येथून एका घराचे खिडकीतून चोरल्याचे सांगितले व लक्ष्मण गाडेकर याचे पॅन्टचे खिश्यात १) गोल्डन रंगाचा सॅमसंग जे-२ कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट २) एम.आय.कं.चा सिल्व्हर ब्लॅक रंगाचा मोबाईल हॅन्डसेट असे मिळून आले त्याबाबत त्याचेकडे विचारपूस करता त्याने सांगितले की, मी व दिनेश कोळी असे मिळून गोकुळ सोसायटीतील एका घराचे अर्धवट उघडया दरवाज्यावाटे आत प्रवेश करून चोरले आहेत. त्याबाबत चिखली पोलीस ठाणे अभिलेखावर पाहता गोल्डन सिल्व्हर मिक्स रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट बाबत चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ६९०/२०१९ भा.द.वि.क.३८० तसेच गोल्डन रंगाचा सॅमसंग जे-२ कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट व एम.आय.कंपनीचा सिल्व्हर ब्लॅक रंगाचा मोबाईल हॅन्डसेट बाबत चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ६९१/२०१९ भा.द.वि.क.३८० अन्वये दाखल असल्याने नमूद आरोपी यांना दाखल गुन्ह्यात अटक केली आहे. एकुण ०२ गुन्हे उघउकिस आणले असून त्यांचा तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप बागुल व पोहवा. रविंद्र काळे हे करीत आहेत.

तसेच चिखली पोलीस ठाणे कडील रेकॉर्ड वरील गुन्हेगार नामे दिनेश राम कोळी वय २२ वर्ष रा. साने चेंम्बर्स,साने कॉलनी,मोरेवस्ती चिखली पुणे हा मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड यांचा तडीपार आदेश क्रमांक २६/२०१९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५६(१)(अ)(ब) नुसार दि.११/१०/२०१९ अन्वये पुणे जिल्ह्यातुन दोन वर्ष मुदतीकरीता दि.११/१०/२०१९ रोजी हद्दपार केले असताना तो मिळुन आला आहे. सदर बाबत चिखली पोलीस ठाणे गुनहा रजि. नं. ६९३/२०१९ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुनहा दाखल केला असून सदर गुन्हयात त्यास अटक केली असून त्याचा तपास पोलीस हवालदार मंगेश गायकवाड करत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त संदीप बिष्णोई, मा. सह पोलीस आयुक्त प्रकाश मुत्याल, मा. अपर पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, मा. पोलीस उपआयुक्त विनायक ठाकणे, मा. सहा. पोलीस आयुक्त संजय नाईक पाटील, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) गणेश जवादवाड, पोलीस उपनिरीक्षक संदीप बागुल, पोलीस उपनिरीक्षक मधुसुदन घुगे, सपोफौज. मधुकर वर्पे, पोहवा. बाबा गर्जे, मंगेश गायकवाड, रविंद्र काळे, आनंद चव्हाण, पोलीस नाईक विश्वास नाणेकर, अमोल साकोरे पोशि. कबिर पिंजारी या पथकाने केली आहे.